
श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

# विज्ञान महाविद्यालय कॉंग्रेस नगर, नागपूर




# डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा 126 वा जयंती उत्सव व्याख्यानमाला!

## <u>व्याख्यानमाला अहवाल</u>

भारताचे पहिले कृषीमंत्री, भारतीय संविधान समितीचे सदस्य तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या **१२६** व्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय कॉंग्रेस नगर, नागपूर च्या वतीने जयंती उत्सव साजरा करण्यात आला. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या **१२६ व्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त** नाशिक जिल्ह्यात विविध ठिकाणी व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती**.**

**अहवाल**

**शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या 126 व्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यान**

**दिनांक: 5 डिसेंबर 2024**

**वेळ: 2:30 वाजता**

**ठिकाण: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीतील सभागृह, नाशिक**

**आयोजक:**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, कांग्रेस नगर, नागपूर

**प्रमुख वक्ते: मा.** श्री. हेमंत वासुदेवराव काळमेघ (कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती)

**कार्यक्रमाचे अध्यक्ष: मा.** प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन

**कार्यक्रमाचा उद्देश:** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचा पुनर्विचार करून ग्रामीण भारताच्या विकासासाठी त्यांच्या विचारांचा प्रसार करणे.

**कार्यक्रमाचा तपशील: मा.** श्री. हेमंत काळमेघ यांनी *"लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख: जीवन व कार्य"* या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी डॉ. देशमुख यांच्या स्वयंपूर्ण ग्रामीण भारताच्या स्वप्नाचे, 1951 साली केलेल्या योजनांचे, तसेच कृषी आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे मार्मिक वर्णन केले.

त्यांनी खालील मुद्द्यांवर विशेष भर दिला:

1. **समाजसुधारणा:** अस्पृश्य विद्यार्थ्यांना भोजन देऊन सामाजिक समतेचा आदर्श निर्माण केला.
2. **शैक्षणिक कार्य:** श्रद्धानंद वस्तीगृह, 'Earn and Learn' योजना, आणि शिवाजी लोकविद्यापीठाच्या संकल्पनेतून शिक्षण क्षेत्रातील अद्वितीय कार्य.
3. **कृषी क्षेत्रातील योगदान:** कृषिमंत्री म्हणून 1961 साली दिल्ली येथे आयोजित केलेले जागतिक कृषी प्रदर्शन.
4. **व्यक्तिमत्व:** वेळेचे नियोजन, स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, आणि बहुप्रतीभा संपन्न नेतृत्व.

**अध्यक्षीय भाषण:** प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी डॉ. देशमुख यांच्या समाजसुधारणेतील कार्याचा सखोल अभ्यास करण्याचे आवाहन केले.

**कार्यक्रमाचे अन्य मान्यवर:**

- डॉ. संजीवनी महाले (व्यवस्थापन मंडळ सदस्य)
- डॉ. जयदीप निकम (संचालक)
- प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख

**कार्यक्रम व्यवस्थापन:**

- प्रास्ताविक: डॉ. गजानन जाधव
- सूत्रसंचालन: डॉ. पुनम वाघ
- आयोजन: डॉ. मधुकर शेवाळे व त्यांच्या सहकाऱ्यांचे नियोजन

**उपस्थिती:**

विद्यापीठाचे अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, आणि विविध विभागांचे शैक्षणिक संयोजक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

# विज्ञान महाविद्यालय, नागपूर

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

शतकोत्तर रौप्य महोत्सव जयंती वर्ष १२५

यांच्या संयुक्त विद्यमाने

**डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त**

## विशेष व्याख्यान

**विषय - लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख : जीवन व कार्य**

बुधवार दिनांक : ४ डिसेंबर २०२४, वेळ : दुपारी ०२.३० ते ३.३०

कार्यक्रमाचे अध्यक्ष

**मा. प्रा. डॉ. संजीव सोनवणे**

कुलगुरू

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

विशेष उपस्थिती

**डॉ. जोगेन्द्रसिंग बिसेन**

प्र-कुलगुरू

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रमुख वक्ता

**मा. श्री. हेमंत वासुदेवराव काळमेघ**

कार्यकारिणी सदस्य

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

समन्वयक

**मा. श्री. दिलीप भरड**

कुलसचिव

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**मा. डॉ. ओमराज देशमुख**

प्राचार्य

विज्ञान महाविद्यालय, नागपूर

आयोजक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, नागपूर

या व्याख्यानास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

## स्थळ

**सभागृह यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

**नाशिक:** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित विज्ञान महाविद्यालय, कांग्रेस नगर, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 28 डिसेंबर 2024 रोजी शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या 126 व्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. **'लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुखः जीवन व कार्य'** या विषयावर व्याख्यान सादर करण्यात आले.

कार्यक्रम विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीतील सभागृहात **मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे** यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. अध्यक्षस्थानी मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू **डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन** होते. मंचावर व्यवस्थापन मंडळ सदस्य **मा. डॉ. संजीवनी महाले**, संचालक **डॉ. जयदीप निकम**, आणि विज्ञान महाविद्यालयाचे **मा.** प्राचार्य **डॉ. ओमराज देशमुख** उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते **मा. श्री. हेमंत वासुदेवराव काळमेघ** (कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी **डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख** यांचे ग्रामीण भारतासाठी स्वयंपूर्णतेचे स्वप्न, शिक्षण आणि कृषी क्षेत्रातील योगदान याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

श्री. काळमेघ यांनी 1951 साली दे **भाऊसाहेब देशमुख** यांनी ग्रामीण भारतासाठी उभे केलेले स्वप्न स्पष्ट केले. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची स्थापना, शिक्षणासोबत श्रमाचे महत्त्व, आणि 'Earn and Learn' योजनेचा उल्लेख करत भाऊसाहेबांचे समाजासाठी केलेले महत्त्वाचे कार्य अधोरेखित केले. अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी भाऊसाहेबांनी घेतलेले पुढाकार आणि त्यांच्या समतेच्या विचारांवरही त्यांनी प्रकाश टाकला.

डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी अध्यक्षीय भाषणात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या बहुआयामी योगदानाचा गौरव केला. त्यांनी **डॉ. भाऊसाहेब देशमुख** यांच्या कार्याचा सखोल अभ्यास करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक **डॉ. गजानन जाधव** यांनी केले. सूत्रसंचालन **डॉ. पुनम वाघ** यांनी केले, तर आभार प्रदर्शन **प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख** यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राचे संचालक **डॉ. मधुकर शेवाळे** व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. यावेळी विद्यापीठाचे अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, आणि शैक्षणिक संयोजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथील व्याख्यानाची क्षणचित्रे







**प्रमुख वक्ते मा. श्री. हेमंत वासुदेवराव काळमेघ (कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) यांचे स्वागत करताना : मा प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन**




**प्रमुख वक्ते मा. श्री. हेमंत वासुदेवराव काळमेघ (कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) उपस्थितांना मार्गदर्शन करताना**




**प्रमुख वक्ते मा. श्री. हेमंत वासुदेवराव काळमेघ (कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) यांचे स्वागत करताना : मा प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन**

## प्रसारमाध्यमांनी घेतलेली नोंद

# 'लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख : जीवन व कार्य' विषय पर व्याख्यान

**पंजाबराव देशमुख ने वर्ष 1951 में ग्रामीण लोगों को आत्मनिर्भर बनाने का सपना देखा था: हेमंत कालमेघ**

महानगर नेटवर्क

नाशिक

श्री शिवाजी शिक्षा संस्थान, अमरावती, नागपुर द्वारा डॉ. के सहयोग से संचालित यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विश्वविद्यालय और विज्ञान महाविद्यालय। पंजाबराव देशमुख के शताब्दी रजत जयंती वर्ष के अवसर पर श्री. हेमन्त कालमेघ, कार्यकारी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्थान, अमरावती के 'लोक महर्षि डॉ. 'पंजाबराव देशमुखः जीवन और कार्य' विषय पर व्याख्यान विश्वविद्यालय के कुलपति प्रो. इसका आयोजन संजीव सोनावणे के मार्गदर्शन में किया



गया। इस अवसर पर कार्यक्रम की अध्यक्षता मुक्त विश्वविद्यालय के कुलपति डॉ. जोगेन्द्र सिंह बिसेन थे। साथ ही प्रबंधन बोर्ड के सदस्य एवं विश्वविद्यालय के निदेशक डॉ. संजीवनी महाले, निदेशकडॉ। ओमराज देशमुख, प्रिंसिपल, जयदीप निकम, कॉलेज ऑफ साइंस, नागपुर भी उपस्थित थे। अपने विचार व्यक्त करते हुए श्रीमान. हेमन्त कालमेघ ने कहा कि पंजाबराव देशमुख ने शिक्षा के क्षेत्र में अपना काम अपनी माँ को समर्पित कर दिया था। कृषि के क्षेत्र में कार्य उनके पिता को समर्पित था। उनका मानना था कि धर्म, जाति, वर्ण, रंग से परे हम सब एक हैं और इसीलिए उन्होंने छात्रावास की स्थापना इस उद्देश्य से की कि सभी जाति और धर्म के बच्चे/छात्र एक ही स्थान पर रहकर पढ़ाई करें।शिक्षा के साथ-साथ कड़ी मेहनत भी होनी चाहिए। पंजाबराव देशमुख कहते थे कि जीवन भर अर्जित की गई शिक्षा ही सच्ची शिक्षा है। उन्होंने अंत में दर्शकों से अपील की कि सभी को पंजाबराव देशमुख के विभिन्न कार्यों को पढ़ना चाहिए।

भ्रमर YCMOU PRO BHR M3 101224

# पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त हेमंत काळमेघ यांचे व्याख्यान संपन्न

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचलित विज्ञान महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीच्या सभागृह येथे अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांचे 'लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख : जीवन व कार्य' या विषयावरील व्याख्यान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन हे होते, तसेच मंचावर विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाच्या सदस्य तथा संचालक डॉ. संजीवनी महाले, संचालक डॉ. जयदीप निकम, विज्ञान महाविद्यालय, नागपूरचे प्राचार्य ओम्‌राज देशमुख हे देखील उपस्थित होते.



मुक्त विद्यापीठात डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात आपले विचार व्यक्त करताना हेमंत काळमेघ, समवेत मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, डॉ. संजीवनी महाले, डॉ. जयदीप निकम, प्राचार्य ओमराज देशमुख.

आपले विचार व्यक्त करताना हेमंत काळमेघ यांनी सांगितले, की पंजाबराव देशमुखांनी आपले शैक्षणिक क्षेत्रातील कार्य आपल्या आईला समर्पित केले होते, तर कृषी क्षेत्रातील कार्य आपल्या वडिलांना समर्पित केले होते. धर्म, जात, पंथ व रंग यांना वेगळे न मानता आपण सर्व एक आहोत, असे ते मानत आणि म्हणूनच सर्व जाती-धर्मातील मुले व विद्यार्थी एका ठिकाणी शिक्षण आणि एका ठिकाणी राहावे या उद्देशाने त्यांनी वसतिगृह स्थापन केले. शिक्षणासोबत परिश्रम केले पाहिजेत. जीवन जगत जगत घेतलेले शिक्षण हे खरे शिक्षण असे पंजाबराव देशमुख म्हणत. त्यांचा कर्मकांडावर विश्वास नव्हता, म्हणून आपल्या वडिलांच्या श्राद्धाप्रसंगी त्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी नेऊन जेऊ घातले. पंजाबराव देशमख हे वेळेचे नियोजन आणि वेळेचे भान असलेले व्यक्तिमत्त्व होते. म्हणूनच त्यांनी स्वातंत्र्यलढा, शैक्षणिक कार्य आणि त्याचबरोबर कृषीक्षेत्रातील योगदान यांचा एकाच वेळी समतोल साधला. त्यांनी विदर्भाबरोबरच देशात इतरही ठिकाणी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. कृषीमंत्री असताना त्यांनी भारतभर सभा घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी दिल्ली येथे जागतिक कृषीप्रदर्शन भरविले होते. त्याप्रदर्शनास त्याकाळी जवळपास ३५ लाख शेतकऱ्यांनी भेट दिली होती. सन १९६१ मध्ये पंजाबराव देशमुख यांच्या हीरकमहोत्सवानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, त्यावेळी त्यांनी शिक्षणाची गंगा बहुजनांपर्यंत नेण्याचे कार्य भाऊसाहेबांनी केले, असे गौरवोद्‌गार काढले. त्याचप्रमाणे यशवंतरावांच्या नावाने असलेले मुक्त विद्यापीठदेखील ज्ञानगंगा घरोघरी नेण्याचे काम करत आहे, असेही शेवटी काळमेघ यांनी सांगितले.

आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी सांगितले, की पंजाबराव देशमुखांचे वरील कार्यांबरोबरच राजकारणातदेखील मोठे योगदान होते. समाजातील प्रश्नांच्या संदर्भात त्यांना जाण होती. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचे विविध ग्रंथ वाचले पाहिजे, म्हणजे त्यांच्या कार्याची आपल्याला सखोल माहिती मिळेल, असेही त्यांनी शेवटी उपस्थितांना आवाहन केले. तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेने विद्यापीठाला कार्यक्रमाच्या आयोजनाची संधी दिली, त्याबद्दल त्यांनी संस्थेचे आभार मानले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गजानन जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. पूनम वाघ यांनी केले, तर आभार प्राचार्य ओमराज देशमुख यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राचे संचालक डॉ. मधुकर शेवाळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते. कार्यक्रमास विविध विद्याशाखेचे संचालक, प्राध्यापक, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व शैक्षणिक संयोजक उपस्थित होते.

## लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त विशेष व्याख्यान

**स्थळ: कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, त्रंबकेश्वर, नाशिक**

**दिनांक: 5 डिसेंबर 2024**

**वेळ: सकाळी 10:30 वाजता**

शिक्षण महर्षी लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, त्रंबकेश्वर, नाशिक येथे 'लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक आणि कृषी क्रांती' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे मुख्य वक्ते माननीय डॉ. पंजाब रामकृष्ण पुंडकर (माजी विभागप्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय, वरुड, अमरावती) होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. दिलीप पवार होते. विशेष उपस्थित म्हणून प्रा. आर. वाय. देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनकार्याचे महत्व अधोरेखित केले. मुख्य वक्ते मा. डॉ. पंजाब रामकृष्ण पुंडकर यांनी आपल्या भाषणात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रात घडवून आणलेल्या क्रांतीची सविस्तर माहिती दिली. त्यांनी बहुजन समाजाच्या हितासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. दिलीप पवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. देशमुख यांच्या समाजहितासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. त्यांनी 'मूठभर धान्य गोळा करून श्रद्धानंद वस्तूगृह स्थापन' करणाऱ्या भाऊसाहेबांच्या समाजनिष्ठेचे महत्व विषद केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. आर. वाय. देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या विचारांचे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रसार होण्याचे महत्व स्पष्ट केले आणि महाविद्यालयाला यासाठी संधी दिल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले.

कार्यक्रमात, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच त्यांच्या जीवनावर आधारित 'लोकनायक डॉ. पंजाबराव देशमुख' हे पुस्तक उपस्थितांना भेट म्हणून देण्यात आले.

या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांची ओळख झाली आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली.

"कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय त्र्यंबकेश्वर, नाशिक' येथील व्याख्यानाची क्षणचित्रे





''कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय त्र्यंबकेश्वर, नाशिक' येथील व्याख्यानाची क्षणचित्रे





**लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त विशेष व्याख्यान**

**स्थळ: भोसला मिलिटरी महाविद्यालय रामभूमी, नाशिक**

**दिनांक: 5 डिसेंबर 2024**

**वेळ: सकाळी ३:०० वाजता**

शिक्षण महर्षी लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त, भोसला मिलिटरी महाविद्यालय रामभूमी नाशिक येथे 'लोकमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख: कृषीक्रांती यामधील परीवर्तन' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते माननीय डॉ. पंजाब रामकृष्ण पुंडकर (माजी विभागप्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय, वरुड, अमरावती) होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉक्टर दिनेश नाईक होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनकार्याचे महत्व अधोरेखित केले.

मुख्य वक्ते डॉ. पंजाब रामकृष्ण पुंडकर यांनी आपल्या भाषणात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषी क्षेत्रात घडवून आणलेल्या क्रांतीची सविस्तर माहिती दिली. कृषक समाजाप्रती भाऊसाहेबांच्या असलेली निष्ठा हि प्रत्यक्षात त्यांच्या कार्यातून स्पष्ट होते. बहुजन समाजाच्या हितासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिनेश नाईक भोसला मिलिटरी महाविद्यालय रामभूमी, नाशिक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या समाजहितासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. त्यांच्या कार्यकर्तृत्वातून निश्चितच आमच्या विद्यार्थ्यांना भावी जीवनासाठी प्रेरणा मिळेल अशी आशा व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. आर. वाय. देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांचे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रसार होण्याचे महत्व स्पष्ट केले आणि महाविद्यालयाला यासाठी संधी दिल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. कार्यक्रमात, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच त्यांच्या जीवनावर आधारित 'लोकनायक डॉ. पंजाबराव देशमुख' हे पुस्तक आणि त्यांची प्रतिमा महाविद्यालयाला सप्रेम भेट म्हणून देण्यात आले.

या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांची ओळख झाली आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली.

"भोसला मिलिटरी महाविद्यालय रामभूमी, नाशिक' येथील व्याख्यानाचे क्षणचित्रे!"











श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती
विज्ञान महाविद्यालय, नागपूर
भोंसला मिलिटरी महाविद्यालय रामभूमी, नाशिक
यांच्या संयुक्त विद्यमाने
डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त
विशेष व्याख्यान
गुरुवार, दिनांक : ५ डिसेंबर २०२४, वेळ : दुपारी २.००

**संदीप विद्यापीठ, नाशिक विशेष व्याख्यानाचा सविस्तर अहवाल**

**विषय:** "लोकमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख – जीवन व कार्य"
**आयोजक:** संदीप विद्यापीठ, नाशिक व श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, नागपूर.
**दिनांक:** २४/०१/२०२५
**स्थळ:** संदीप विद्यापीठ, नाशिक
**वेळ:** दुपारी १:०० ते २:००

संदीप विद्यापीठ, नाशिक आणि श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन व कार्यावर आधारित विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात भाऊसाहेबांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि कृषी योगदानावर सखोल चर्चा करण्यात आली.

**कार्यक्रमाची सुरुवात**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रेरणादायी कार्याचा उल्लेख केला. त्यांच्या जीवनकार्यामुळे महाराष्ट्राच्या तरुण पिढीला नवी दिशा मिळेल, असे त्यांनी नमूद केले. भाऊसाहेबांनी शोषित, पीडित, वंचित, आणि पददलितांसाठी केलेल्या कार्याचा गौरव करताना, त्यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शिक्षणाला उंचीवर नेल्याचे अधोरेखित केले.

**विशेष व्याख्यान**

मुख्य व्याख्यानासाठी प्रा. पंजाब पुंडकर यांनी "लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख – जीवन व कार्य" या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवनातील विविध पैलूंचा उल्लेख करत, त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला.

प्रा. पुंडकर यांनी भाऊसाहेबांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेताना, त्यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी उभारलेला लढा, सहकार चळवळ, आणि ग्रामीण शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान हे सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच, भाऊसाहेबांच्या राजकीय कारकिर्दीतून संसदेत मांडलेल्या लोकाभिमुख धोरणांचा उल्लेख केला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आर्थिक आणि सामाजिक सबलीकरण मिळाले, असे प्रा. पुंडकर यांनी स्पष्ट केले.

**अध्यक्षीय भाषण**

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संदीप वाघ यांनी भाऊसाहेब देशमुख यांच्या विचारांवर भर देत विद्यार्थ्यांना प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, भाऊसाहेबांचे जीवन हे प्रत्येकासाठी आदर्श आहे, आणि त्यांचे विचार आत्मसात करून विद्यार्थ्यांनी आपले जीवन समृद्ध करावे.

**आभार प्रदर्शन**

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. गजानन जाधव यांनी केले. त्यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

**उपस्थित मान्यवर**


या विशेष व्याख्यानासाठी प्रा. डॉ. निसार ए रेशी (डीन ऑफ सायन्स, संदीप विद्यापीठ), प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख, प्रा. पंजाब पुंडकर, प्रा. राजेंद्र देशमुख, समन्वयक श्री. एस. एस. कावळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर आधारित हे व्याख्यान विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे ठरले. त्यांच्या योगदानाच्या आठवणींनी उपस्थितांची मने भारावून गेली. भाऊसाहेबांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा जतन करून, समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करण्याची प्रेरणा या व्याख्यानातून मिळाली.

**आयोजन समितीचे विशेष योगदान:** कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन संदीप विद्यापीठ, नाशिक आणि विज्ञान महाविद्यालय, नागपूर यांनी संयुक्तपणे केले.



**शिवाजी विज्ञान महाविद्यालया नागपूर यांच्या वतीने संदीप विद्यापीठ नाशिक यांना डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची प्रतिमा व त्यांचा जीवन व कार्यावरील पुस्तक भेट म्हणून देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख, प्रा. डॉ. निसार ए रेशी (डीन ऑफ सायन्स, संदीप विद्यापीठ), आणि प्रमुख व्याख्याते प्रा. पंजाब पुंडकर**


SANDIP
UNIVERSITY





श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती
विज्ञान महाविद्यालय, नागपूर
व
सांदिप विद्यापीठ, नाशिक
यांचे संयुक्त विद्यमाने

## शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त विशेष व्याख्यान

### विषय : लोकमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख – जीवन व कार्य

– कार्यक्रमाचे अध्यक्ष –
**मा. निसर ए. रेशी**
डीन, स्कुल ऑफ सायन्स
सांदिप विद्यापीठ, नाशिक

– प्रमुख वक्ता –
**डॉ. पंजाब पुंडकर**
माजी विभाग प्रमुख,
महात्मा फुले महाविद्यालय, वरुड, जि. अमरावती९

शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५ वेळ : दु. १.३० ते २.३०

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती
विज्ञान महाविद्यालय, नागपूर
व
सांदिप विद्यापीठ, नाशिक
यांचे संयुक्त विद्यमाने

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त विशेष व्याख्यान

विषय : लोकमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख – जीवन व कार्य

– कार्यक्रमाचे अध्यक्ष –
मा. निसर ए. रेशी
डीन, स्कुल ऑफ सायन्स
सांदिप विद्यापीठ, नाशिक

– प्रमुख वक्ता –
डॉ. पंजाब पुंडकर
माजी विभाग प्रमुख,
महात्मा फुले महाविद्यालय, वरुड, जि. अमरावती९

शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५ वेळ : दु. १.३० ते २.३०

**समन्वयक**

**मा. प्रा. डॉ. संदीप वाघ**
संदीप विद्यापीठ, नाशिक

**मा. प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख**
श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती
द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय,
नागपूर

**आयोजक**

संदीप विद्यापीठ , नाशिक
आणि
श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, नागपूर

**या व्याख्यानास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे**

**स्थळ**

**विद्यापीठ सभागृह, संदीप विद्यापीठ, नाशिक**

**श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालय, नाशिक विशेष व्याख्यानाचा सविस्तर अहवाल**

**स्थळ:** महाविद्यालय सभागृह, श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालय, नाशिक

**दिनांक:** २४ जानेवारी २०२५,

**वेळ:** सकाळी ११:३० ते दुपारी १२:३०

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, नागपूर आणि श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी *"लोकमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख – जीवन व कार्य"* या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी ११:३० वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये भाऊसाहेबांच्या प्रेरणादायी जीवनकार्याची महत्त्वपूर्ण ओळख करून दिली.

**कार्यक्रमाची सुरुवात : प्रास्ताविक व स्वागतपर भाषण**

श्री शिवाजी शिक्षण संस्था, नागपूर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आपल्या भाषणात त्यांनी डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. त्यांनी म्हटले, *"भाऊसाहेबांनी शोषित आणि वंचित समाजघटकांसाठी केलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या वैचारिक वारशाचा लाभ आजच्या विद्यार्थ्यांनी घ्यायला हवा"* असे आवाहन उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

**मुख्य व्याख्यान**

कार्यक्रमाचे मुख्य प्रवक्ते प्रा. पंजाब पुंडकर (माजी विभागप्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय, वरुड) यांनी *"लोकमहर्षी डॉ. पंजाबरावmदेशमुख यांच्या बहुआयामी जीवन व कार्य"* या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी डॉ. भाऊसाहेबांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेत त्यांच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या स्थापनेतील योगदानावर भर दिला. ग्रामीण भागातील शिक्षण प्रसारासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनमान उन्नतीसाठी त्यांनी उभारलेल्या सहकार चळवळीची सविस्तर माहिती प्रा. पुंडकर यांनी मांडली. तसेच भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांच्या आत्मनिर्भरतेसाठी राबविलेल्या योजना, त्यांच्या कृषी धोरणांवरील दृष्टिकोन, आणि शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान यावर त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार दिले.

**आणि अध्यक्षीय भाषण**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा वाघ उपस्थित होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी मराठा शिक्षण प्रसारक समाज संस्थेच्या कार्यकुशलतेचे कौतुक करताना, *"डॉ. भाऊसाहेब देशमुखांचे कार्य हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून, आजच्या तरुण पिढीसाठी आदर्श आहे,"* असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी भाऊसाहेबांचे विचार अंगीकारून सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्नशील राहावे, असा संदेश त्यांनी दिला.

**कार्यक्रमाची सांगता**

कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन डॉ. गजानन जाधव यांनी केले. त्यांनी उपस्थित मान्यवर, विद्यार्थी, आणि शिक्षकांचे आभार मानताना असे कार्यक्रम पुढील पिढ्यांना वैचारिक मार्गदर्शन आणि प्रेरणा देण्यासाठी कसे महत्त्वाचे ठरतात, यावर भर दिला.

**उपस्थित मान्यवर व उपस्थिती**

या विशेष व्याख्यानाला प्राचार्य डॉ. प्रतिभा वाघ, प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख, प्रा. पंजाब पुंडकर, प्रा. राजेंद्र देशमुख, समन्वयक श्री. एस. एस. कावळे यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**कार्यक्रमाचे आयोजन व ठिकाण**

**आयोजक संस्था:**

1. श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, नागपूर
2. श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नाशिक

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांचे आजच्या समाजासाठी महत्त्व अधोरेखित करत, त्यांच्या विचारसरणीने विद्यार्थ्यांना नवी दिशा देण्याचे कार्य या व्याख्यानातून झाले.

**व्याख्यानाची क्षणचित्रे**









## व्याख्यानाची क्षणचित्रे






श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, नागपूर
व
श्रीमती विमलाबेन खिमजी तेजूकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नाशिक
यांचे संयुक्त विद्यमाने

# शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त विशेष व्याख्यान

## विषय : लोकमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख - जीवन व कार्य

– कार्यक्रमाचे अध्यक्ष –
**डॉ. प्रतिभा वाघ**
प्राचार्य,
श्रीमती विमलाबेन खिमजी तेजूकाया कला,
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नाशिक

– प्रमुख वक्ता –
**डॉ. पंजाब पुंडकर**
माजी विभाग प्रमुख,
महात्मा फुले महाविद्यालय, वरुड, जि. अमरावती९

शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५ वेळ : स. ११.३० ते १२.३०

### समन्वयक

**मा. प्राचार्य एस. एस. कावळे**
रुसा समन्वयक
श्री. वि. खि. ते. कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, नाशिक

**मा. प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख**
श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, नागपूर

### आयोजक

श्रीमती विमलाबेन खिमजी तेजूकाया कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, नाशिक

आणि

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, नागपूर

**या व्याख्यानास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे**

### स्थळ

महाविद्यालय सभागृह, श्रीमती विमलाबेन खिमजी तेजूकाया कला, विज्ञान आणि वाणिज्य